d:\apa 2023\letter 2023.doc


# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

कृषि नगर, वसमत रोड, परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.nic.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


वाचा : विद्यापीठ परिपत्रक क्र.अेपीअे-१ दिनांक १०.०२.२०२०

शिक्षकवर्गीय अधिकारी/कर्मचा-यांना चर्चासत्र/ /संमेलन/परिषद/कार्यशाळा/प्रशिक्षणास उपस्थित राहण्याकरीता परवानगी देण्याबाबत.

**विद्यापीठ परिपत्रक**

क्र.२०२३/प्र.क्र.११०२/आस्था-१/ 1757

दिनांक : १८ एप्रील २०२३ 20

**परिपत्रक :**

संदर्भीय परिपत्रकान्वये शिक्षकवर्गीय अधिका-यांनी आर्थीक वर्षातून एकदाच चर्चासत्र/संमेलन/परिषद /कार्यशाळा/प्रशिक्षण करीता कुलसचिव यांच्यामार्फत मा.कुलगुरू महोदय यांची परवानगी घेऊन उपस्थित राहण्याबाबतच्या सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर तरतूदीचे पालन न करणा-या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट नमूद केलेले आहे.

परंतू बहुतांश शिक्षकवर्गीय अधिकारी हे सदर परिपत्रकाचे पालन न करता चर्चासत्र/संमेलन/परिषद/ कार्यशाळा/प्रशिक्षण करीता उपस्थित राहून त्याची नोंद सेवा पुस्तकात घेण्याकरीता पत्रव्यवहार करीत आहेत. त्यामुळे सदर विषयी खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१) तीन (३) दिवसापेक्षा जास्त कालावधीच्या चर्चासत्र/संमेलन/परिषद/कार्यशाळा/प्रशिक्षणास उपस्थित राहण्यापुर्वी / नोंदणी करण्यापुर्वी ते करण्यास विहित मार्गाने नियुक्ती प्राधिका-याची मंजुरी घेण्यात यावी.

२) नियुक्ती प्राधिका-याच्या परवानगीशिवाय केलेल्या कोणत्याही चर्चासत्र/संमेलन/परिषद/कार्यशाळा/प्रशिक्षण हे त्यांच्या सेवाविषयक बाबी/ कॅस अंतर्गत वेतनश्रेणी करीता ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

३) तीन (३) दिवसापेक्षा कमी कालावधीच्या चर्चासत्र/संमेलन/परिषद/कार्यशाळा/प्रशिक्षणास उपस्थित राहण्यापुर्वी / नोंदणी करण्यापुर्वी ते करण्यास विहित मार्गाने संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/संचालक संशोधन/ संचालक विस्तार शिक्षण यांची मंजुरी घेण्यात यावी.

४) तीन (३) दिवसापेक्षा अधिक कालावधीच्या चर्चासत्र/संमेलन/परिषद/कार्यशाळा/प्रशिक्षणास उपस्थित राहण्यापुर्वी / नोंदणी करण्यापुर्वी ते करण्यास प्राप्त प्रस्तावांची तपासणी संचालक स्तरावर करण्यात येऊन पात्र अधिकारी/कर्मचा-यांचे प्रस्ताव शिफारशीसह कुलसचिव कार्यालयास सादर करावेत.

५) विहित परवानगी न घेता पुर्ण केलेले चर्चासत्र/संमेलन/परिषद/कार्यशाळा/प्रशिक्षणाची नोंद मुळ सेवा पुस्तकात घेतली जाणार नाही याची दक्षता संबंधित कार्यालय प्रमुखाने घ्यावी.

६) ऑनलाईन चर्चासत्र/संमेलन/परिषद/कार्यशाळा/प्रशिक्षणास उपस्थित राहण्यापुर्वी / नोंदणी करण्यापुर्वी त्यांच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होणार नाही अशा आशयाचे संबधिताचे हमीपत्र व त्यास कार्यालय प्रमुख/ नियंत्रण अधिकारी यांची मान्यता असणे आवश्यक आहे.

**मा. कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने व आदेशान्वये,**

(धिरजकुमार रा.कदम)

**कुलसचिव**

**प्रत :**

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/संचालक संशोधन/ संचालक विस्तार शिक्षण वनामकृवि, परभणी
२. सर्व आहरण व संवितरण अधिकारी, वनामकृवि, परभणी.
३. नियंत्रक वनामकृवि, परभणी
४. मा.कुलगुरू यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.
५. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिद्ध करावे.